rtmnuonline.com



# Bachelor of Arts (B.A.) Part—II Fourth Semester Examination

## MARATHI (Optional)

## (Literature)

वेळ: तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :—** (1) **पाचही** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. नवकाव्याचे काव्यात्मक स्वरूप स्पष्ट करून वैशिष्ट्यांवर चर्चा करा. 16

**किंवा**

'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेचे रसग्रहण करा.

2. कवितेची व्याख्या सांगून 'काव्य' संकल्पना विस्तृतपणे स्पष्ट करा. 16

**किंवा**

'स्वप्नाची समाप्ती' कवितेचे रसग्रहण करा.

3. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील पद्यांशाचा संदर्भासह अर्थ लिहा :— 16

**गट 'अ'**

(क) समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा ?
जात्याच रूक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आन्तर अग्नी क्षणभर तरि फुलवावा !

(ख) ज्योतीतुनि धावत या तेज:कण सारे
या यज्ञातिल अन् सरणातील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवु द्या वणवा कणाकणात मशाली
हिमलाट पहारे पहा जगावर आली !

(ग) रण काय भयानक-लोळे आग जळात।
आदळती, वळती, आवळती क्रोधात,
जणु जिंकायासी गगणाचे स्वामित्व
आषाढघनाशी झुंजे वादळवात।

(घ) चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !"

**किंवा**

rtmnuonline.com

गट 'ब'

(च) श्वासांनो, जा वायूसंगे ओलांडुनि भिंत
अन् आईला कळवा अमुच्या हृदयातिल खंत
सांगा वेडी तुझी मुले ही या अंधारात
बद्ध करांनी अखेरचा तुज करिती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचे एकच होते वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

(छ) स्मित करून म्हणाल्या मला चांदण्या काही,
तो मुक्त प्रवासी फिरत सदोदित राही
उठतात तमावर त्याची पाउलचिन्हे
त्यांनाच पुससि तू, आहे की तो नाही !

(ज) ती कणखर मूर्ती धीट मराठी थाट
आदळतो जीवर अजून पश्चिम-वात,
ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील
जी पाहुनि सागर थबके, परते आत

(झ) कुणि देवदूत वा फुलवुनि पंख फुलांचे
तीरावर वसला मोजित कण शतकांचे
दे सुवर्णपूजक जनतेला सन्देश
'धन एकच आहे जगती अमर कलेचे।'

4. पुढीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा :— 16

गट 'क'

(त) 'प्रतिभा' ही एक अलौकिक शक्ती आहे, कसे ते लिहा.

(थ) 'भावनात्मकता प्रबळ झाल्याशिवाय काव्यलेखन होवू शकत नाही', स्पष्ट करा.

(द) 'संकेतितार्थ' यावर टीपा लिहा.

(ध) 'व्यंजनाशक्ती' म्हणजे काय ? त्याच्या प्रकारांची माहिती लिहा.

**किंवा**

गट 'ड'

(प) 'प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' कशी ते स्पष्ट करा.

(फ) 'प्रतिभेचा सहज उत्कट विलास म्हणजे स्फूर्ती', कसे ते स्पष्ट करा.

(ब) 'लक्षणा' या शब्दशक्तीवर टीपा लिहा.

(भ) शाब्दी व्यंजनेविषयी थोडक्यात माहिती लिहा.

835 www.rtmnuonline.com 835 835 www.rtmnuonline.com 835 835

rtmnuonline.com

5. सर्व प्रश्नांची **दोन** किंवा **तीन** वाक्यात उत्तरे लिहा — 16

(1) रसयात्रा या काव्यसंग्रहातील कोणत्याही चार सामाजिक कवितेची नावे लिहा.

(2) ध्येय, प्रेम, आशा याची होतसे का कधी पूर्ती

\-----------------------------------

ही काव्यपंक्ती पूर्ण करा.

(3) "अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !" या ओळीचा अर्थ सांगा.

(4) कुसुमाग्रजांचे पूर्ण नाव लिहून त्यांच्या कोणत्याही दोन काव्यसंग्रहाचे नाव लिहा.

(5) संस्कृत साहित्यज्ञांनी केलेल्या प्रतिभेच्या कोणत्याही दोन व्याख्या लिहा.

(6) काव्यनिर्मितीसाठी संस्कृत साहित्यज्ञांनी सांगितलेली तीन कारणे सांगा.

(7) लक्ष्यार्थ म्हणजे काय ? लक्ष्यार्थासाठी आवश्यक बाबी कोणत्या ?

(8) 'वाच्य-वाचक संबंध' म्हणजे काय ?

835